# मराठा साम्राज्यातील स्त्रियांची सामाजीक स्थिती

प्रा.डॉ.शिवाजी गाढे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,लातूर

**प्रस्तावना :-**

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रीयापेक्षा पुरूषाला महत्व देण्यात आले आहे.स्त्रीयांवर अनेक बंधने लादण्यात आली होती.प्राचीन काळापासून ही परंपरां चालत आलेली होती. स्त्रियांचे कार्य क्षेत्र केवळ चूल आणि मूल या चार भिंतीच्या आतच बंदिस्त झाले होते.या पुरूष प्रधान व्यवस्थेमध्ये तीला दुय्यम स्थान प्राप्त झाले होते. मध्ययुगीन कालंखंडा पासून मुलींचे विवाह 8 ते 9 वर्षातच होत होते.म्हणजेच बालविवाह प्रथा प्रचलीत होती.तीला तीच्या हक्काची व सामाजीक स्वातंत्र्याची जाणीव नव्हती.तीचा जन्म केवळ दु:ख भोगण्यासाठीच आहे अशी तीची मानसिकता झालेली होती.स्त्रियांमध्ये ही दोन वर्ग होते.एक उच्च कुलीन स्त्रिया व सर्व सामान्य स्त्रिया उच्च कुलीन स्त्रियांना काही प्रमाणात शिक्षण,व राज्य कारभार करण्याचा अधिकार होता.सती जाने ही त्या त्या परिस्थीतीवर अवलंबुन होते.परंतु सर्व सामान्य कुटुंबातील स्त्रियांना पडदा पध्दत,व इतर सामाजीक अधिकारापासून दूर ठेवले जात होते.हिंदु कुटुंबातील स्त्रियांना आपल्या वडीलांच्या संपत्तीतील वाटा मिळत नसे.कारण धर्माने त्यांना वारसा हक्क नाकारला होता.मराठा सत्ता ही महाराष्ट्रया अजुबाजूच्या प्रदेशावर ही होती.त्याच बरोबर मोगल व मराठा ही दोन्ही घराणे महाराष्ट्रात वास्तव्यास होते. त्या दोन्ही समाजातील स्त्रियांच्या जीवनाचा अभ्यास सदरील शोधनिबंधात करण्यात येणार आहे.महाराष्ट्रात सतीची चाल अस्तीत्वात होती.ब्राम्हण मराठा आणि लढवय्य जातीतील महिलामध्ये ही प्रथा प्रामुख्याने आढळुन येते.परंतु तत्कालीनप मुस्लीम स्त्रियांत ही पध्दत नव्हती.कोकनात स्त्रियांमध्ये तीन वर्ग आढळून येत घरंदाज स्त्रिया,सामान्य (देवसाशी) स्त्रिया आणि वेश्या,विवाहीत स्त्रिया हया घरंदाज होत्या देवदार्शिना कोकनात भावीन म्हणतात. पुजेच्या वेळी त्या नाच गाणे करीत असत.

मराठा कालखंडा मध्ये महाराष्ट्रातील अस्थिर सामाजीक स्थिती होती.तत्कालीन राजकीय सत्ता संघर्षात कोणत्याही,प्रकारच्या स्त्रियांच्या स्थितीचा शोध घेणे थोडे असंभव आहे. ज्या काळात पुरूषांच्या जीवनाचे काही खरे नव्हते त्याकाळात स्त्रियांची व त्याच्या कार्याची नोंद ठेवली जाणे अशक्य होते. परंतू तत्कालीन कांही ग्रंथ कागदपत्रे,यांच्या आधारावरच तत्कालीन स्त्रियांच्या सामाजीक स्थितीची माहिती प्राप्त होते.

**उदिष्टये :-**

1) मराठा साम्राज्य कालीन स्त्रियांच्या सामाजीक स्थितीचा अभ्यास करणे.
2) मराठा कालीन स्त्रियांचे सामाजीक,धार्मिक जीवन कशा प्रकारचे होते याची माहिती घेणे.
3) मराठा कालीन स्त्रिया रूढी बंधनात अडकल्या होत्या का? त्याचा अभ्यास करणे.
4) मराठा कालीन स्त्रियांच्या वर्गा संबंधी अभ्यास करणे.

**बालविवाह :-**

मराठा कालखंडामध्ये मुलींचा विवाह लहान वयातच केला जात असे .तीला आपला जीवनसाथी निवडण्याचा अधिकार नव्हता.तसेच लग्नाच्या वेळी वधुपित्याला वरास मोठा हुंडा द्यावा लागत असे.तसेच कुटुंबामध्ये वधूचे स्थान गौन होते.पती हा आपल्या पत्नी पेक्षा आई व बहीनीला जास्त महत्व देत असे.सुन ही सासुच्या हुकुमात असे. बऱ्याच वेळा तीचा छळ केला जाई या छळात सासुबरोबर पती ही सामील होत होता. त्या काळात बालविवाहाची प्रथा प्रचलीत होती.

“इ.स.1640 मध्ये शिवाजी महाराजांचे सई बाईशी लग्न झाले त्या वेळी शिवाजी 10 वर्षाचा होता.व सईबाई केवळ 6 वर्षाची होती.येशु बाईचे लग्न 1667 मध्ये तेव्हा ती आठ

वर्षाची होती.गोपीकाबाई 5 वर्षाची असताना 1730 मध्ये 8 वर्षाच्या बाळाजी बाजीरावांशी तिचा विवाह झाला.ही पध्दती खालच्या जातीतही रूढ होती.बालविवाहात नवऱ्याचे वय 13 ते 14 वर्षाचे असे आणि मुलीचे वय 10 ते 11 वर्षाचे असे." 1

बालविवाहानंतर कित्येकदा संसाराची मधुर फळे चाखण्यापूर्वीच वैधव्य येत असे."अशा वेळी स्त्रियांचे पाउल वाकडे पडले की वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांची स्थिती अत्यंत केविलवाणी असे देहसंपत्ती संपली की पोट भरण्यासाठी भिक मागण्याशिवाय त्यांना गत्यंतर नसे." 2 काही जातीत जन्माला आलेल्या मुला-मुलींना देवास वाहण्याची प्रथा होती.त्यास वाघ्या किंवा मुरळी म्हणत मुरळीचे कर्तव्य देवाची सेवा करणे हे होते.मुरळी अनेकाच्या वासनेची शिकार होत असे.कारण मुरळी व देवदासीला विवाह करण्याची परवानगी नव्हती यामूळे वेश्या व्यवसायाला चालना मिळत असे.

**जबरदस्तीचे विवाह :-**

आदिवाशी (रानटी) जमातीत ही प्रथा प्रचलीत होती. तसेच आदिवाशी तरूणाच्या विवाह करीता पैशांची गरज असे मुलगी पळवून नेऊन जबरदस्तीने विवाह केल्याची उदाहरणे ब्राम्हण कुटुंबात देखिल आहेत. मुलींची विक्री करून ही तत्कालीन लोक अमाप पैसा कमवत असत .

" भिवुबाई व्यास नावाच्या महिलेने 1770 ते 1771 मध्ये आपल्या मुलीचे दोनदा लग्न करून दिले व दोन्ही नवऱ्याकडून पैसा वसुल केला.जेव्हा पेशव्यांना हे कळले तेव्हा त्यांनी त्या स्त्रिला तिच्या भावाला व मुलीला कैद करण्याचा आदेश दिला.जबरदस्तीने केलेल्या विवाहापासून सुटका मागता येत नसते.त्याकरीता विवाह हा विशिष्ट धार्मिक संस्काराशिवाय घाईगर्दीने झाला असल्याचे सिध्द करावे लागेल."

**वारसा हक्क :-**

पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीची दयनीय अवस्था होत असे पतीच्या मृत्यूनंतर स्त्रिचे दागदागीने घेतले जात.तिचे केशवपण करण्यात येई आणि अशा विद्रुप अवस्थेत तिला गुलामापेक्षा देखील हलके जिवन जगावे लागत असे. तसेच," जर एखाद्या विधवेचा पती कुटुंबातून विभक्त झाला असेल. आणि त्याला वारसा नसेल तरच विधवेला त्याची मालमत्ता मिळत असे एकत्र कुटुंबात विधवेला केवळ अन्नवस्त्रायाच आधिकार होता.एकत्र कुटुंबात वडील किंवा पती यांच्या संपत्तीतील स्त्रीचा हिस्सा समाज संमत करत नव्हता.परंपरा आणि सामाजीक विचार सरणी यांनी विविध बंधने घालून देखिल त्या काळच्या स्त्रियांच्या कोणती प्रत्यक्ष कामगिरी केली ते आपण पाहिले पाहिजे.स्त्रीयांच्या सर्वच वर्गावर रूढी आणि धार्मिक नियमांचा परिणाम होत नसे.कामकरी कष्टकरी वर्गात स्त्री व पुरूष दोघांनाही उदरनिर्वाहासाठी काम करावे लागे आणि स्त्रीची आर्थिक मदत ही कमी असली तरी महत्वाची असे." 3

तत्कालीन समाजा मध्ये रूढीची बंधने असल्याने स्त्रीयांना संपत्तीचा अधिकार नव्हता. केवळ परावलंबी जीवन त्यांना जगावे लागत असे पतीच्याच्या संपत्तीमध्ये तीला कोणताही अधिकार नव्हता.

**गुलामगीरी :-**

तत्कालीन महाराष्ट्रा मध्ये गुलामगीरी ही तूरळक प्रमाणात अस्तित्वात होती कुणबीन ही मध्ययुगीन महाराष्ट्रातील एक गुलाम व जा प्रथा होती ही गुलामी स्त्रियापुरती मर्यादित होती.कुणबीन विकत घेतली जात असे ती शुद्र जातीची असे दुष्काळ किंवा लढाईत ती कुटुंबाकडून विकली जात असे तिची किंमत तिचे काम वय व रूप यांच्या दर्जाप्रमाणे ठरत असे.कुणबीन ही तत्कालीन गुलाम म्हणून विकली जात असे म्हणून " गुलाम पुरूषाला कुणबी व गुलाम स्त्रीला कुणबीन म्हणत.गुलाम हे त्याच्या मालकाची संपत्ती समजली जात असे.गुलाम पुरूषापेक्षा गुलाम स्त्रीला अधिक मागणी असे.गुलाम स्त्रिची किंमत तिच्या सौंदर्यावरून व कलागुणावरून ठरत असे." 4 काही स्त्री गुलामांना केवळ आपल्या मालकीणीच्या अगर शारीरिक भूक भागविण्यासाठी ठेवल्या जात असत.राजे रजवाडयांच्यात गुलाम मुलींना नाचगाणी शिकविली जात असत. व त्यांना जनान खान्यात ठेवण्यात येत असे.अशा प्रकारे बटक्या ठेवणे हे सतराव्या शतकात नेहमीचेच होते.

**सती प्रथा :-**

मध्ययुगामध्ये ही सतीची प्रथा अस्तित्वात होती.तत्कालीन उच्च समजल्या जाणाऱ्या ब्राम्हण,मराठा,आणि लढवय्य जातीत सतीप्रथा अस्तित्वात होती.जर एखाद्या स्त्रीच्या पतीचा मृत्यू झाला तर तीला तीच्या पतीच्या चितेवरच सती जावे लागत असे. याच बरोबर रखेल्या आणि दासी हया देखील

आपल्या मालकाच्या चित्तेवर स्वतःला जाळुन घेत परंतू ही प्रथा फार कमी प्रमाणात अस्तित्वात होती. मराठा कालखंडात ब्राम्हणेत्तर कुटुंबातील विधवांना पुर्नविवाहाची परवानगी होती.आपले धार्मिक वर्चस्व वाढवण्यासाठी प्रभू आणि सोनार हया देखील आपापल्या जातीत विधवा विवाहाला बंदी घालण्याचा प्रयत्न केला तत्कालीन मराठा समाजात विधवा विवाहाला

“ पाट ” असे म्हणतात पाट लावलेल्या दुसऱ्या लग्नाच्या पत्नीला पहिल्या लग्नाच्या पत्नी प्रमाने हक्क नसत. पुढे ही सती प्रथा बंद झाली व स्त्रियांना पुर्नविवाहाचा हक्क मिळाला.

छत्रपती शिवाजी महाराजांना स्त्रियाबद्दल आदर होता.त्यांच्या बद्दलचा आदर व्यवहारात उतरवित असत.त्यांना मानसन्मानाची वागणूक देत होते. तसेच त्यांचा वडिलोपार्जीत संपतीतील हक्क व अधिकार मान्य करत असत.शिवाजी महाराजांचे आयुष्य त्यांच्या आईच्या संस्कारात वाढले होते.या आईच्या संस्कारामूळे त्यांनी स्त्रियांना समानतेची वागणूक दिली होती.“ ग्रँड डफने आपल्या मराठयांच्याबखरी त असे नमुद केले आहे की शिवाजीने सुरतेवर हल्ला केल्या नंतर तिथले कांही लोक स्त्रियांच्या वेश घेऊन पळुन जाऊ लागले याचे कारण शिवाजीची माणसे स्त्रियांना सुखरूप जावू देतात त्यांना त्रास देत नाहीत.किंवा पकडत नाहीत असा त्यांचा लौकिक होता.व लोकांचा तसा अनुभव ही होता.” 5 मराठा कालखंडामध्ये स्त्रियाचे दोन वर्ग होते.एक नौकरदाराचा राजे रजवाडयांचा आणि दुसरा सर्व सामान्य कामगार,गरिबांचा यामूळे या दोघांमधील अधिकार वेगवेगळे होते.सतीप्रथा बालविवाह,गुलामगिरी अशा प्रकारच्या सामाजीक जीवनात चालीरिती अस्तित्वात होत्या.परंतू छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या साम्राज्यात स्त्रियांना सन्मानाची वागणूक देऊन त्याचा मानसन्मान करत असत.अशा प्रकारचे वर्ग तत्कालीन समाज जीवनात दिसून येत होते.

**निष्कर्ष :-**

1) तत्कालीन स्त्रियांमध्ये दोन वर्ग होते.
2) स्त्रियांना संपत्तीचा अधिकार दिला जात नव्हता पती निधनानंतर स्त्रिया सती जात असत.
3) मुस्लीम स्त्रिया हया घोषा पध्दतीत अडकलेल्या होत्यातर हिंदू स्त्रिया धर्माच्या बंधनात अडकलेल्या होत्या.
4) बाल विवाह पध्दती मूळे अनेक स्त्रियांचे जीवन उध्दवस्त झाले होते.कारण पुर्नविवाहाचा अधिकार नव्हता.
5) तत्कालीन स्त्री जीवन हे परावलंबी होते.पतीच्या संपत्तीमध्ये अधिकार नसल्याने कुटुंबातील इतर व्यक्तीच्या म्हणन्याप्रमाणे त्यांना जगने भाग होते.

**संदर्भ सूची :-**

1) डॉ.वि.गो.खोबरेकर,महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड (भाग - 1) शिवकाल,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ,मुंबई नोव्हेबर 2006,पृ.608
2) प्रा.मदन मार्डीकर,मराठयांचा इतिहास, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद,जून 1998,पृ.419
3) डॉ.वि.गो.खोबरेकर - पृ 611
4) प्रा.मदन मार्डीकर पृ 419,420
5) नीलीमा भावे,शिवकालीन स्त्रियांच्या अधिकार कक्षा, पाप्युलर प्रकाशन,मुंबई,पहिली आवृत्ती,2010/1932 पृ.75